यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dr_estb@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230051

आस्थापना कक्ष / Establishment Section

जावक क्र. – यचममुवि/आस्था/2025/ 1246

दिनांक - 21.8.2025

परिपत्रक

विषय – शासकीय कर्मचाऱ्यांनी सोशल मिडियाचा वापर करतांना अनुसरणीय मार्गदर्शक सूचनांबाबत

विद्यापीठातील सर्व नियमित, करारावरील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी आणि दैनंदिन वेतनावरील कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. वशअ-1125/प्र.क्र.39/विचौ-1, दिनांक 28 जुलै 2025 अन्वये शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सोशल मिडिया वापरताना आवश्यक असलेल्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उक्त शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार सर्व संबंधित शिक्षकांनी/ शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांनी पुढील गोष्टींचे पालन करणे बंधनकारक आहे:

1. सोशल मिडियाचा वापर अत्यंत जबाबदारीने करावा.
2. वैयक्तिक व शासकीय अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत.
3. शासन धोरणांवर किंवा केंद्र/राज्य शासनाच्या कार्यवाहीवर नकारात्मक टीका करू नये.
4. सोशल मिडियावर गोपनीय कागदपत्रे किंवा माहिती शेअर करू नये.
5. व्हॉट्सॲप, टेलिग्राम इत्यादी केवळ कार्यालयीन समन्वयासाठीच वापरावेत.
6. स्वतःची स्तुती करणाऱ्या पोस्ट टाळाव्यात.
7. शासकीय सन्मान, चिन्हे, लोगो इ. चा वापर वैयक्तिक सोशल मिडिया खात्यांवर टाळावा.
8. प्राधिकृत नसताना कोणतीही योजना किंवा माहिती सार्वजनिक करू नये.
9. विद्यापीठाची ध्येय धोरणे यावर सार्वजनिकरित्या टिका-टिप्पणी करू नये.
10. विद्यापीठाच्या सन्मानीय प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयांवर सामाजिक माध्यांमावर चर्चा करू नये.
11. समाज माध्यमांवर विद्यापीठाचे मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, संवैधानिक अधिकारी, शिक्षक व इतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांबाबत कुणाच्या वैयक्तिक चारित्र्य हनन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

वरील सूचनांचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

तरी सर्व संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी वरील शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

कुलसचिव

प्रत माहितीस्तव -

01. मा.कुलगुरू यांचे कार्यालय
02. मा.प्र-कुलगुरू यांचे कार्यालय

प्रत माहितीस्तव आणि कार्यवाहीस्तव-

1) मा.संचालक - विद्याशाखा/ प्रमुख-विभाग/केंद्र/कक्ष/ वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार-य.च.म.मु.विद्यापीठाचे सर्व विभागीय केंद्र - यांना विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.